सत्यमेव जयते
**डॉ. जगदीश पाटील**
**आयुक्त**
**भा.प्र.से. (से.नि.)**

# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
# महाराष्ट्र राज्य, पुणे

**जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे ४११००१.**

**कार्यालय : ०२०-२६०५११७७**
**ई-मेल :** sceapune@gmail.com

६८३६
अ.शा. पत्र रासनिप्रा/कक्ष- १०/नि.का./ अ.शा.प.क्र. / /२०१९.
दिनांक :-३०.८.२०१९.

विषय :- **निवडणूकीस पात्र सहकारी संस्थेची निवडणूक प्रक्रिया मुदतीत व अचुक, निर्दोष मतदार यादीच्या आधारे पुर्ण करणे बाबत.**

संदर्भ :- १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ सीबी (१).
२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ अअअ (३).
३. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ सीबी (१०).
४. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ आय.
५. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अे.
६. कार्यासन अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग यांच्याकडील परिपत्रक जा.क्र. संकीर्ण ०९१८/प्र.क्र. १०९/१३ स, दिनांक ३.७.२०१९
७. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. १४४०/सन २०१६, दिनांक ११.३.२०१६.
८. या प्राधिकरणाकडील परिपत्रक जा.क्र. २८३४/सन २०१६, दिनांक ७.५.२०१६.

आपले लक्ष संदर्भीय तरतुद व आदेशाकडे वेधण्यात येत आहे.

२/- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ सीबी (१) मधील तरतुदीनुसार प्रत्येक सहकारी संस्थेच्या (२५० पेक्षा कमी सभासद संख्या असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्था वगळून) संचालक मंडळाची निवडणूक घेण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाची आहे. सहकारी संस्थांच्या निवडणुकीच्या प्रयोजनार्थ प्राधिकरणाने आपणांस जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी म्हणून घोषित केलेले आहे.

३/- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ अअअ (३) मधील तरतुदीनुसार संस्थेच्या संचालक मंडळाचा कालावधी निवडणूकीच्या दिनांकापासून पाच वर्षांचा असून पाच वर्षाच्या कालावधीनंतर समिती सदस्यांची पदे आपोआप रिक्त झाल्याचे समजण्यात येते. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ सीबी (१०) मधील तरतुदीनुसार संस्थेची निवडणूक प्रक्रिया विदयमान संचालक मंडळाची मुदत संपुष्टात येण्यापुर्वी पुर्ण होऊन नवनिर्वाचीत संचालक मंडळाने पदभार स्वीकारणे बंधनकारक आहे. तसेच अधिनियमाचे कलम ७३ सीबी (१५) व कलम १६६ (४) मध्ये सुधारणा झालेली असून यापुर्वी देण्यात आलेली मुदतवाढ सुधारीत तरतुदीनुसार संपुष्टात आलेली आहे.

४/- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ आय मधील तरतुदीनुसार संस्थेने निवडणूकीकरीता आवश्यक असणारी ई १, ई २, ई ३ नमुन्यातील माहिती व निर्धारीत निवडणूक निधी जिल्हा/प्रभाग/तालुका सहकारी निवडणूक अधिकाऱ्यांकडे विहीत मुदतीपूर्वी सादर करणे बंधनकारक आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील विविध तरतुदी विचारात घेता कोणत्याही परिस्थितीत विदयमान संचालक मंडळाची मुदत संपुष्टात येण्यापुर्वी निवडणूक प्रक्रिया पुर्ण होणे अनिवार्य असल्याचे स्पष्ट होते.

५/- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अे मधील तरतुदीनुसार प्रशासक नियुक्त संस्थेची निवडणूक प्रक्रिया प्रशासक नियुक्तीपासून सहा महिन्यांच्या आत पुर्ण होऊन पदभार नवनिर्वाचीत समिती सदस्यांकडे सुपूर्त होणे बंधनकारक आहे. परिणामी संबंधीत प्रशासकाने दैनंदिन कामकाजासोबतच संचालक मंडळाची निवडणूक प्रक्रिया विहित मुदतीत पुर्ण होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती व्यवस्था करणे बंधनकारक आहे. तथापी, काही प्रकरणात प्रशासक नियुक्त कालावधीत निवडणूक प्रक्रिया पुर्ण होऊन नवनिर्वाचीत समितीकडे पदभार सुपूर्त केल्याचे दिसून येत नाही. परिणामी प्रशासकाचा वैध कालावधी संपल्यानंतरही संस्थेवर प्रशासकच कामकाज पाहतांना दिसून येतात ही बाब अतिशय गंभीर आहे. यास्तव आपल्या स्तरावरून प्रशासक नियुक्त संस्थांच्या निवडणूक कामकाजांचा आढावा घेऊन निवडणूक प्रक्रिया मुदतीत पुर्ण करण्याची आवश्यक ती कार्यवाही करावी. सदर प्रकरणी महाराष्ट्र शासनाने संदर्भ क्रमांक ६ अनुसार परिपत्रक निर्गमीत केले असून सदर परिपत्रकांचे काटेकोरपणे पालन करावे. कोणत्याही परिस्थितीत प्रशासक विहीत कालवधीपेक्षा जास्त कालावधीकरीता कार्यरत राहणार नाहीत याची दक्षता संस्थेच्या निबंधकांनी घ्यावी.

६/- अचुक व निर्दोष मतदार यादी सहकारी संस्थेच्या निवडणूकीचा आत्मा असून निवडणूकीकरीता तयार होणाऱ्या मतदार यादीचे अधिक्षण, निर्देशन व नियंत्रण करण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त असल्यामुळे प्राधिकरणाने संदर्भ क्रमांक ७ च्या आदेशानुसार मतदार यादी तयार करण्याच्या दृष्टीकोनातुन सविस्तर मार्गदर्शक सुचना निर्गमीत केलेल्या आहेत. सदर सुचनांचे काटेकोर पालन करुन संस्थांच्या निवडणूकीकरीता अचुक व निर्दोष मतदार यादया तयार करणे अपेक्षीत आहे. मतदार यादी तयार करतांना संस्थेने **खालील बाबींचे** कटाक्षाने पालन केले आहे किंवा कसे ? याची खात्री करावी.

१. प्रारुप मतदार यादी तयार करण्यापुर्वी सहकारी संस्थांच्या सभासदत्व विषयक अभिलेख उदा. आय, जे १ व जे २ नमुन्यातील नोंदवहया अदयावत आहेत किंवा कसे ? याची खात्री करावी. सदर प्रकरणी प्राधिकरणाने संदर्भ क्रमांक ८ अनुसार परिपत्रक निर्गमीत केलेले असून सदर परिपत्रकाचे पालन करावे.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ५ (२) मधील तरतुदी नुसार निवडणूक पात्र सहकारी संस्थेने नमुना ई २ मधील माहिती मुदत संपण्यापुर्वी सहा महिने अगोदर जिल्हा / तालुका / प्रभाग निवडणूक अधिकाऱ्याकडे सादर करणे बंधनकारक असून नियम ६ (३) मधील तरतुदीनुसार प्रारुप मतदार यादीच्या चार प्रती मुदत संपण्याच्या १२० दिवस अगोदर जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकाऱ्याकडे सादर करणे आवश्यक आहे. तरी निवडणूक नियमातील या तरतुदीचे काटेकोर पणे पालन होईल असे नियोजन करावे.

३. थकबाकीदार सभासदांना मतदानाचा अधिकार नसल्यामुळे अशा सभासदांची स्वतंत्र यादी तयार करण्याच्या सुचना संस्थेला दयाव्यात व त्याप्रमाणे प्रारुप मतदार यादीची पडताळणी करावी.

४. क्रियाशील व अक्रियाशील सभासदाबाबतच्या तरतुदी नजीकच्या काळात पार पाडण्यात येणाऱ्या सहकारी संस्थांच्या संचालक मंडळाच्या निवडणूकांना लागु होत असल्यामुळे मतदार यादी तयार करतांना अक्रियाशील सभासदांचा समावेश मतदार यादीमध्ये झालेला नाही याची खात्री करावी.

पडताळणी करीता संस्थेकडून क्रियाशील व अक्रियाशील सभासदांची यादी नमुना जे १ व जे २ मध्ये घेण्यात यावी व त्याप्रमाणे प्रारुप मतदार यादीची पडताळणी करावी.

५. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २६ (१) मधील पहिल्या परंतुकानुसार संस्थेच्या कोणत्याही सभासदास सभासदत्वाबाबतची संस्थेच्या उपविधीन्वये विहीत करण्यात येईल अशी रक्कम संस्थेला चुकती करेपर्यंत सभासदास हक्काचा वापर करता येणार नाही अशी तरतुद आहे. तसेच याच कलमातील दुस-या परंतुकानुसार सभासदत्वाच्या हक्काचा वापर करण्यासाठी भाग भांडवलातील सभासदाच्या किमान अंशदानात वाढ केल्यास सभासदांना यथोचित मागणी नोटीस देणे आवश्यक असून अनुपालन करण्यासाठी वाजवी कालावधी देणेदेखील आवश्यक आहे. याबाबींची पडताळणी देखील प्रारूप यादी सादर झाल्यानंतर करण्यात यावी.

उपरोक्त बाबीची खात्री करण्याकरीता आपण आपल्या अधिनस्त निवडणूकीस पात्र सहकारी संस्थांची आढावा बैठक / कार्यशाळांचे आयोजन करावे. तसेच सदरच्या सुचना आपल्या अधिनस्त प्रभाग/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या निदर्शनास आणून कार्यवाही करणे बाबत आपल्या स्तरावरुन आदेशीत करावे.

सही/- आपला,

(डॉ. जगदीश पाटील)

**प्रति,**
श्री. अजय कडु,
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी,
तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव :-**

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर विभाग विभाग, नागपूर.